# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः16.07.2025** **वारःबुधवार**

1. भारतीय अंतराळवीर शुभांशु शुक्ला यांच्यासह त्यांचे तीन सहकारी सुखरूप पृथ्वीवर दाखल; देशभरातून अभिनंदनाचा वर्षाव
2. शांघाय सहकार्य संघटनेनं दहशतवाद, फुटीरतावाद आणि अतिरेकीवादाच्या मुद्द्यांवर तडजोड न करता कठोर भूमिका घ्यावी-परराष्ट्र मंत्री एस जयशंकर यांचं आवाहन
3. 'एक जिल्हा एक उत्पादन 2024 अंतर्गत देशात, महाराष्ट्रानं केली चमकदार कामगिरी आणि
4. देशाच्या अनेक भागात जोरदार ते मुसळधार पाऊस पडण्याचा हवामान खात्याचा अंदाज

**<u>शुभांशू शुक्ला</u>**

भारतीय अंतराळवीर ग्रुप कॅप्टन शुभांशु शुक्ला आणि ॲक्सिओम फोर मोहिमेतले त्यांचे तीन सहकारी काल सुखरूप पृथ्वीवर परतले. आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकातून त्यांना घेऊन निघालेलं स्पेस एक्सचं ड्रॅगन अंतराळ यान कॅलिफोर्नियात पॅसिफिक महासागरात उतरलं. हे अंतराळवीर आता पृथ्वीवरच्या वातावरणाशी जुळवून घेण्याकरता 7 दिवस विलगीकरणात राहणार आहेत. 18 दिवसांच्या अंतराळ मुक्कामात शुक्ला यांनी भारतासाठी 7 वेगवेगळे प्रयोग केले आहेत.

ॲक्सिओम फोर मोहीम यशस्वीपणे पूर्ण करून पृथ्वीवर परतल्यानंतर काल देशभरातून शुभांशू शुक्ला यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव करण्यात आला. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी ग्रुप कॅप्टन शुक्ला यांचं समाज माध्यमावरुन अभिनंदन केलं. ही मोहीम भारताच्या अंतराळ क्षेत्रातील प्रगतीतील मैलाचा दगड ठरला आहे असं राष्ट्रपतींनी म्हटलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही शुक्ला आणि त्यांच्या सहकाऱ्यांचं स्वागत केलं; शुक्ला यांची कामगिरी देशाच्या गगनयान मोहिमेतील पुढचं पाऊल असल्याचं मोदी यांनी म्हटलं आहे. अंतराळ स्थानकात गेलेल्या भारताच्या सुपुत्राचं पृथ्वीवर यशस्वी पुनरागमन ही अभूतपूर्व घटना असल्याची प्रतिक्रीया केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांनी दिली आहे. ग्रुप कॅप्टन शुक्ला पुनर्वसन कार्यक्रमानंतर 17 ऑगस्टच्या सुमाराला मायदेशी परतण्याची शक्यता असल्याचं त्यांनी नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत सांगितलं. यावेळी बोलताना ते म्हणाले...

**भारत मां का एक पुत्र आज कामयाबी से लौटा है। एक ऐसे प्रयोग से एक ऐसी यात्रा से जिसमें बहुत सारे ऐसे एक्सपेरिमेंट्स किए गए जो पहले कभी न किये गए थे लेकिन जिनका समस्त मानव जाति के लिए महत्व रहेगा। आज वास्तव में विश्वबंधु के रूप में शुभाषांशु ने हमारी तर्जुबानी करते हुए वो काम वहां अंजाम दिया है और ये कह सकते हैं कि अंतरिक्ष में एक स्थायी स्थान भारत को आज स्थापित करने का अवसर भी रहा। सफलता भी रही।**

शुभांशू शुक्ला सुखरूप पृथ्वीवर परतल्यानंतर त्यांच्या कुटुंबीयांनी लखनौ इथं आनंदोत्सव साजरा केला. देशभरात अनेक ठिकाणी या घटनेबद्दल जल्लोष करण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांनीही समाज माध्यमावर शुभेच्छा संदेश दिले.

**जयशंकर**

शांघाय सहकार्य संघटनेनं अर्थात एससीओनं दहशतवाद, फुटीरतावाद आणि अतिरेकीवादाच्या मुद्द्यांवर तडजोड न करता कठोर भूमिका घ्यावी, असं आवाहन भारताचे परराष्ट्र व्यवहारमंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी काल चीनमधील तियानजिन इथं झालेल्या परराष्ट्र मंत्र्यांच्या बैठकीत केलं. पहलगाममधील दहशतवादी हल्ला धार्मिक फूट पाडण्याच्या उद्देशानं जम्मू आणि काश्मीरची पर्यटन अर्थव्यवस्था कमकुवत करण्यासाठी करण्यात आला. संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेनं या घटनेचा निषेध केला असून, या निंदनीय कृत्याचे गुन्हेगार, वित्तपुरवठादारांना जबाबदार धरण्याची गरज अधोरेखित केली आहे, असंही त्यांनी सांगितलं. सध्या आर्थिक अस्थिरता वाढत असून, भारतानं स्टार्टअप आणि नवोपक्रमापासून ते पारंपरिक औषधनिर्मिती आणि डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांपर्यंतच्या क्षेत्रात अनेक पुढाकार घेतले आहेत. एससीओमध्ये सहकार्य वाढवण्यासाठी अधिक व्यापार, गुंतवणूक आणि देवाणघेवाण आवश्यक आहे यावर त्यांनी भर दिला. एससीओ क्षेत्रात खात्रीशीर वाहतूक नसल्याकडे त्यांनी लक्ष वेधले. आंतरराष्ट्रीय उत्तर दक्षिण वाहतूक कॉरिडॉरला गती देण्याच्या गरजेवर त्यांनी भर दिला.

**स्किल इंडिया**

स्किल इंडिया उपक्रमाचा फायदा अनेक देशवासियांना झाला असून या उपक्रमामुळे नवीन कौशल्ये आणि संधी निर्माण झाल्या आहेत असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या समाज माध्यमावरील संदेशात म्हटलं आहे. या मिशनच्या दहाव्या वर्धापनदिनाचं औचित्य साधून सरकार कुशल आणि स्वावलंबी युवकांची फळी निर्माण करण्याप्रती वचनबद्ध आहे असंही त्यांनी म्हटलं आहे. दुसऱ्या एका संदेशात मोदी यांनी भारताच्या हरित आणि शाश्वत भविष्य घडवण्याच्या वचनबद्धतेवर भाष्य केलं आहे. भारतानं 2030 च्या उद्दिष्टाच्या पाच वर्षे आधीच 50 टक्के जैविक इंधन क्षमतेचं लक्ष साधलं आहे अशी माहिती दिली आहे.

**एक जिल्हा, एक उत्पादन**

'एक जिल्हा एक उत्पादन 2024' अंतर्गत महाराष्ट्रानं चमकदार कामगिरी केली असून राज्याला 'अ' श्रेणीतील सुवर्ण पदक प्राप्त झाले आहे. रत्नागिरी जिल्ह्याला हापूस आंब्यासाठी कृषी क्षेत्रातील 'अ' श्रेणीअंतर्गत प्रथम स्थान मिळालं आहे. नागपूरच्या संत्र्यांनी द्वितीय स्थान, अमरावती जिल्ह्याने मंदारिन संत्र्यांसाठी तृतीय स्थान प्राप्त केलं तर नाशिक जिल्ह्यानं द्राक्षे आणि मनुक्यांसाठी कृषी क्षेत्रातील श्रेणी 'अ' अंतर्गत विशेष उल्लेख पुरस्कार मिळवला. अकोला जिल्ह्याने गैर-कृषी क्षेत्रातील श्रेणीतील 'ब' श्रेणी अंतर्गत कापूस जिनिंग आणि प्रेसिंगसाठी विशेष उल्लेख पुरस्कार प्राप्त केला आहे.

**इंधन- आयात शुल्क**

रशियातून इंधन, गॅस आणि युरेनियम आयात करणाऱ्या देशांवर शंभर टक्के वाढीव आयातशुल्क लादण्याचा इशारा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी दिला आहे. रशिया युक्रेनबरोबरचं युद्ध संपवण्यात अपयशी ठरत असल्यानं आपण नाखूश असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. नाटोचे सरचिटणीस मार्क रुट्टे यांनी काल व्हाईट हाऊसमध्ये ट्रंप यांची भेट घेतली. त्यानंतर ट्रंप बोलत होते. या परिस्थितीचा सामना करण्यासाठी कोणतेही नवीन उपाय करावे लागल्यास रशिया त्याचं योग्य व्यवस्थापन करू शकेल असं रशियाचे परराष्ट्र मंत्री सर्गे लावरोव यांनी म्हटलं आहे. भारत रशियाकडून मोठ्या प्रमाणावर इंधनाची आयात करतो त्यामुळे या निर्णयाचा फटका भारताला बसणार आहे.

**इस्रायल हल्ले**

इस्रायली हवाई हल्ल्यात गाझा पट्टीमध्ये मागच्या दोन दिवसात 90 हून अधिक लोक मृत्युमुखी पडले अशी माहिती गाझाच्या आरोग्य मंत्रालयाने दिली आहे. 278 लोक जखमी झाले असून त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं. सोमवारच्या एका हल्ल्यात एकाच कुटुंबातील 19 जण मरण पावले, असं एका रुग्णालयाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. सिरीया मध्येही रविवारी हल्ले सुरु झाल्यापासून अंदाजे 100 जण मृत्युमुखी पडले आहेत. लेबेनॉनमध्येही इस्रायली हवाई हल्ल्यांमध्ये किमान 12 लोक ठार आणि आठ जखमी झाले अशी माहिती लेबेनॉनच्या अधिकाऱ्यांनी आणि माध्यमांनी दिली आहे.

**इराण-सूचना**

इराणमध्ये भारतीय नागरीकांना अनावश्यक प्रवास टाळण्याची सूचना भारतीय दूतावासानं दिली आहे. इराणममधून भारतात परत येण्याची इच्छा असलेल्या भारतीय नागरीकांसाठी सध्या उपलब्ध असलेल्या व्यावसायिक विमान आणि फेरीच्या पर्यायांचा लाभ घेता येईल असं दूतावासानं म्हटलं आहे.

**कोकेन जप्त**

मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर दोहा येथून आलेल्या एका भारतीय महिलेकडून, मुंबईच्या गुप्तचर विभागानं 6 किलोपेक्षा अधिक वजनाचं कोकेन काल जप्त केलं, याची किंमत 62 कोटी रुपयांहून अधिक आहे.

**पिथोरागड**

उत्तराखंडमधील पिथोरागड इथं झालेल्या रस्ते अपघातातील जीवितहानी बद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दु:ख व्यक्त केलं आहे. पिथोरागड जिल्ह्यातील मुवानी भागात थल-पिथोरागड मार्गावर एक वाहन नदीत कोसळून झालेल्या अपघातात 8 जणांचा मृत्यू झाला होता. प्रधानमंत्री राष्ट्रीय आपत्ती मदत निधीतून, पंतप्रधानांनी, मृतांच्या नातलगांना दोन लाख रुपये आणि जखमींना 50 हजार रुपयांची मदत जाहीर केली आहे.

**बॅडमिंटन**

टोकियो इथं होणाऱ्या जपान खुल्या सुपर 750 बॅडमिंटन स्पर्धेत भारताची ऑलिंपिक विजेती पी.व्ही. सिंधू, लक्ष्य सेन आणि पुरुष दुहेरी जोडी सात्विक साईराज आणि चिराग शेट्टी यांच्यासह अव्वल बॅडमिंटनपटू आज विविध सामन्यांत खेळणार आहेत. सध्या जागतिक क्रमवारीत 15 व्या स्थानावर असलेले सात्विक साईराज आणि चिराग शेट्टी यांचा सामना आज कोरियाच्या कांग मिन ह्युक आणि की डोंग जू यांच्याशी होईल. एकेरीत, लक्ष्य सेनचा सामना चीनच्या वांग झेंग झिंगविरुद्ध, तर पी.व्ही. सिंधूचा सामना दक्षिण कोरियाच्या सिम यु-जिनशी होईल.

**महिला फुटबॉल**

ताश्कंद इथं आज 20 वर्षांखालील भारतीय महिला फुटबॉल संघाचा उझबेकिस्तानविरुद्ध दुसरा आणि शेवटचा सामना होणार आहे. भारतीय वेळेनुसार रात्री साठेआठ वाजता हा सामना सुरू होईल. दोन्ही संघ पुढील महिन्यात होणाऱ्या महिला आशियाई चषक पात्रता फेरीसाठी तयारी करत आहेत.

**निधन**

ज्येष्ठ अभिनेते आणि निर्माते धीरज कुमार यांचं काल सकाळी न्यूमोनियानं मुंबईत निधन झालं. ते 79 वर्षांचे होते. त्यांनी अनेक हिंदी आणि पंजाबी चित्रपटांमध्ये काम केलं. 'रोटी कपड़ा और मकान', 'सरगम' आणि 'क्रांती' यांसारख्या चित्रपटांमध्ये त्यांनी सहाय्यक भूमिका साकारल्या होत्या. त्यांच्या पार्थिव देहावर आज अंत्यसंस्कार होण्याची शक्यता आहे.

**हवामान**

बिहार, कर्नाटक किनारपट्टीलगतचा प्रदेश, पूर्व मध्य प्रदेश, पूर्व राजस्थान, पूर्व उत्तर प्रदेश, जम्मू आणि काश्मीर, लडाख, केरळ, महे, आणि झारखंडमध्ये आज अनेक ठिकाणी जोरदार ते मुसळधार पाऊस पडण्याचा अंदाज भारतीय हवामान विभागानं व्यक्त केला आहे. ओडिशा, पंजाब, पश्चिम बंगालचा काही भाग, सिक्कीम, तमिळनाडू, पुदुचेरी आणि उत्तराखंडमध्येही पुढील 2-3 दिवसांमध्ये जोरदार पावसाचा अंदाज आहे. आंध्र प्रदेशात ठिकठिकाणी आज उष्ण आणि दमट हवामान राहील.

## याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.